# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

**Price Rs. 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

# संवाद

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥***

**Vol.-1** **Issue - 10** एप्रिल २००९ **April 2009**


## j ***संपादकीय***

नमस्कार मित्रांनो,

आपण आपलं पूर्वसंचित अनुभवांच्या कुपीत साठवून सतत पुढे वाटचाल करीत असतो. आपण नवे नवे अनुभव घेत असतो तसतसे आपले व्यक्तिमत्त्व नि जीवन समृद्ध होत जाते. भविष्याकडे होणारी आपली घोडदौड यशस्वी होण्यासाठी आपल्यातील आत्मविश्वास व श्रद्धा या गोष्टी आपल्याला साह्यभूत होतात आणि त्यामुळेच आपण नवी आव्हाने समर्थपणे पेलू शकतो. जुन्याला आपण प्रेमाने निरोप देतो आणि नव्याचं नव्या उत्साहाने स्वागत करतो. या आपल्या स्वभावाला किंवा परंपरेला अनुसरूनच आपण ३१ डिसेंबरच्या रात्री १२ वाजता सरत्या वर्षाला प्रेमाने निरोप देतो आणि नव्या वर्षाचे फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत करतो. आपले नित्याचे बहुतेक सर्व दैनंदिन व्यवहार इसवीसनानुसार होत असल्यामुळे ही प्रथा आपल्या अंगवळणी पडावी यात नवल ते काय ? पण हिंदु पंचांगानुसार हिंदु नववर्ष दिन गुढीपाडव्याला (चैत्र शुद्ध प्रतिपदा) येत असल्यामुळे त्या दिवशी सकाळी सुर्योदयाच्या वेळी विविध शहरांतून चौका चौकात गुढ्या उभारून, रस्त्यांवरून रांगोळ्या काढून, लेझीम-ताशे-वाजंत्र्यांच्या निनादात भव्य प्रभातफेऱ्या काढून हिंदु नववर्षाचं (शालिवाहन शकाचं) पारंपारिक पद्धतीने उत्साहात स्वागत करण्यात येतं. या वर्षी २७ मार्च या दिवशी हा सोहळा पार पडला. नवे वर्ष-मग ते आपल्या अंगवळणी पडलेलं 'इसवीसन' असो की 'शालिवाहन शक' असो - त्या त्या वेळी आपली भावना समानच असते आणि शुभेच्छा, शुभचिंतन वा शुभसंदेश यांच्याद्वारे एकमेकांशी व्यक्त होते.

माणूस हा मूलतः आशावादीच असतो. निराशावादापेक्षा, नकारात्मक विचारांच्या आधीन होऊन दुःखी-कष्टी होण्यापेक्षा आशावादी असणं केव्हाही चांगलंच नव्हे का ? त्यामुळे सरत्या वर्षापेक्षा येणारे नवे वर्ष सर्वांना अधिकाधिक सौख्य, समृद्धी, समाधान व आनंद देणारे जावे अशीच आपण मनोमनी इच्छा बाळगतो व ती एकमेकांपाशी व्यक्त करतो.

आपल्या जीवनात 'आर्थिक वर्षा ' ला देखील महत्त्व आहे हे आपण जाणतोच. दि. २७ मार्च ला गुढीपाडव्यापासून हिंदू नव वर्ष (शक किंवा संवत १९३१) सुरू झालं तर त्यानंतर चारच दिवसांनी दि.१ एप्रिलपासून (२००९-२०१० हे) आर्थिक वर्ष सुरू झालं. नव्या आर्थिक वर्षातील 'संवाद' चा हा पहिलाच अंक. नेहमीच्या प्रथेनुसार देशाचा अर्थसंकल्प मांडला गेला. सार्वत्रिक निवडणुका तोंडावर आल्या की समाजातल्या विविध घटकांवर सवलतींचा वर्षाव केला जाणे ही गोष्ट आता समाजाच्या अंगवळणी पडलेली आहे. यामध्ये राज्यकर्त्या पक्षाचा सत्तासंपादनाचा राजकीय स्वार्थ दडलेला असतो. अर्थसंकल्पावरील विविध पक्षांच्या म्हणजेच सत्ताधारी आघाडीतील घटक पक्षांच्या आणि विरोधी पक्षातील पुढाऱ्यांच्या प्रतिक्रियादेखील अपेक्षेनुसार ठराविक साच्याच्या असतात, याची देखील आता सर्वांना सवय झालेली आहे.

सवयीवरून आठवण झाली. आपण सेवानिवृत्त होण्यापूर्वी बरीच वर्षे बँकेतील विविध पदांवर नोकरी केलेली आहे. या सेवाकाळात दरवर्षी सादर होणाऱ्या अर्थ संकल्पाद्वारे 'इन्कम टॅक्स' म्हणजेच आयकरात कोणते बदल झाले आहेत त्याकडे आपलं बारकाईने लक्ष असायचं. त्यानुसार आपल्याला गुंतवणूक-बचत यांचं गणित आखावं लागे. पण सेवानिवृत्तीनंतर याची खरंतर तेवढीशी गरज नाही. पण तरीही आपण केवळ सवयीचे गुलाम झाल्याने तेवढ्याच उत्साहाने व गांभीर्याने दरवर्षी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाविषयी विचार करतो, त्यावर चर्चा करतो, आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतो. अर्थात त्यामागे सामन्य जनतेला नव्या अर्थसंकल्पामुळे कोणत्या समस्यांना (विशेषतः महागाईला) सामोरे जावे लागणार आहे याविषयीची आपल्या मनातील काळजीची भावना देखील असते. म्हणजेच दुसऱ्या शब्दात सांगायचं तर केवळ सवय म्हणून नव्हे तर आपल्या मनात काही प्रमाणात का होईना सामाजिक बांधिलकीची भावना असल्यामुळे आपण आतादेखील अर्थसंकल्पाकडे गांभीर्याने पाहतो.

तेव्हा मित्रांनो, इसवी सन २००९, शालिवाहन संवत १९३१ आणि नवे आर्थिक वर्ष २००९-२०१०. या सर्व नव वर्षांच्या आपणा सर्वांना आमच्या मनापासून शुभेच्छा !

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**

# युनिट वार्ता

## अकोला युनिट -

भारतीय स्टेट बँक रीजनल बिझीनेस ऑफिस अकोला यांच्या सौजन्याने दि. २१ मार्च २००९ रोजी अकोला युनिटची वार्षिक सभा बँकेच्या 'ज्ञानार्जन केन्द्रा'त सदस्यांच्या भरगच्च उपस्थितीत संपन्न झाली. सभेचे उद्‌घाटन बँकेचे रीजनल मॅनेजर श्री. गणेशजी तिवारी यांनी केले व अध्यक्षस्थान नागपूर सेंटरचे अध्यक्ष श्री. श्रीकांत देसाई यांनी भूषविले. तसेच ज्ञानार्जन केन्द्राचे श्री. प्रकाश राऊत, पणजी (गोवा) येथील संस्थेचे अध्यक्ष श्री. नारकर, संस्थेचे जनरल सेक्रेटरी पुणे येथील श्री. लळिंगकर व श्री. वकील, सेक्रेटरी नागपूर हे विशेष अतिथी उपस्थित होते.

दीप प्रज्वलनानंतर प्रमुख पाहुणे श्री. गणेशजी तिवारी यांचा शाल व श्रीफल देऊन संघटनेचे अकोला जिल्हा प्रमुख श्री नीळकंठ नागराज यांनी सत्कार केल्यानंतर सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे पदाधिकारी श्री. अण्णासाहेब काळे अध्यक्ष, श्री नाना महाजन ट्रेझरर, श्री. यादवडकर, श्री. ए.डी.काळे, श्री. अविनाश देशपांडे यांनी पुष्पगुच्छ देऊन गेले.

सुरूवातीला ह्यावर्षी ज्या सभासदांचे दुखःद निधन झाले त्यांचे प्रती शोकसंवेदना व्यक्त करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यात दिवंगत सर्वश्री सुभाषजी चंदाराणा, बी.एन.जोशी, ई.डी.काळबांधे, नानासाहेब घिके, विजयराव सकळकळे, ए.बी.शर्मा, एन.बी.धुमाळे, शालीग्राम मोकळे यांचा समावेश होतो. तसेच मुंबई येथील दि, २६.११.०८ रोजी आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रथम संघटनेचे अकोला व वाशिम जिल्हा शाखेचे सचिव श्री. नागराज यांनी प्रास्ताविक भाषण करून आपला अहवाल सादर केला व नियोजित सत्कारार्थी श्री. जयंतराव तळणीकर, सहाय्यक महाप्रबंधक, ज्ञानार्जन केन्द्र, अकोला हे अतिशय महत्त्वाच्या कार्यालयीन कामामुळे उपस्थित राहू न शकल्याबद्दल जाणवलेल्या उणीवेचा विशेष उल्लेख केला.

ज्या सभासदांनी वयाची पंचाहत्तरी गाठली त्यांचा सत्कार संस्थेचे गोवा येथील अध्यक्ष श्री. पी.एम.नारकर व नागपूर झोनचे अध्यक्ष श्री. श्रीकांतजी देसाई यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. सर्वश्री मनोहरराव देवकर, श्रीकृष्ण सोमण, राजाभाऊ अग्निहोत्री व वसंतराव साबळे यांचा समावेश होतो.

या सभेत श्री. तिवारी, रिजनल मॅनेजर, यांनी असोसिएशनबद्दल गौरवोद्‌गार काढून सर्व वरिष्ठांप्रती अतिशय भावपूर्ण शब्दात आदर व्यक्त करून, 'ज्या घरात वरिष्ठ व्यक्ती असतात त्या घराला नेहमीच आशीर्वाद लाभत असतात', असे प्रतिपादन केले व ज्या जेष्ठांनी वर्षानुवर्षे बँकेची सेवा केली. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण तत्पर राहू असे सांगितले.

संस्थेचे मुंबई सर्कलचे उपाध्यक्ष व गोवा येथील अध्यक्ष श्री. नारकर यांनी सेवानिवृत्तांनी तीन 'एम' ह्या अक्षरांची काळजी घ्यावी म्हणजे मनी, मेडीकल व मेन्टल पीस ह्याकडे लक्ष द्यावे असे सांगितले. तसेच तीन 'एफ' बद्दल म्हणजे फायनान्स, फॅमिली व फूड आणि आपल्या प्रलंबित मागण्या तीन 'सी' नेच साध्य होऊ शकतात त्या म्हणजे, कंडक्ट, कोऑर्डिनेशन व कोर्ट केसेस हे लक्षात ठेवावे असे आपल्या वैशिष्टपूर्ण शैलीत सांगून श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली.

पुणे येथील सेक्रेटरी श्री. लळिंगकर यांनी श्रोत्यांच्या उत्सुकतेप्रमाणे मद्रास कोर्ट केस, नागपूर कोर्ट केस व दिल्ली कोर्ट केसेसवर प्रकाश टाकून फॅमिली पेन्शनर्सना लवकरच मिळणाऱ्या वाढीबद्दल चर्चा केली.

श्री. वकील, सेक्रेटरी, नागपूर यांनी पेन्शन खात्याबद्दल नॉमिनेशन व जॉईंट अकाऊंट बद्दल, फॉर्म १५ एच व टीडीएच संदर्भात व पेन्शनरांनी करावयाच्या प्लॅनींग बद्दल माहिती दिली.

सभेचे अध्यक्ष श्री. श्रीकांत देसाई यांनी सर्व विषयांचा आढावा घेतला. पेन्शनर्ससाठी असलेल्या सर्व योजनांचे अवलोकन केले व आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती देऊन सदर आवेदन पत्रे नागपूर येथे सब सेंटरला अकोला युनिटमार्फत पाठविल्यास त्याबद्दल पाठपुरावा करण्यात येईल याची खात्री दिली व निवडणूक श्री.नारकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वांच्या सहकार्याने पार पडली व निवडून दिल्याबद्दल आभार मानले व अकोला येथील सभासदांचे संबंध अत्यंत सहकार्याचे व सामंजस्याचे असल्याबद्दल उल्लेख करून भव्य उपस्थितीबद्दल व अकोला केन्द्राच्या प्रगतीबद्दल स्तुती केली. तसेच अकोला शहरात ९६% असलेल्या सभासद सदस्यतेबद्दल कौतुक केले.

कार्यक्रमाचे संचलन श्री.मदन घिके ह्यांनी तर आभार प्रदर्शन श्री.पानसे यांनी केले. कार्यक्रमाचे शेवटी अकोल्यातील प्रतिथयश गायक श्री.देवेंद्र देशमुख यांच्या संच्याचा गाण्याचा सुंदर कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमास आर.बी.ओ. ऑफिसचे श्री.सप्रे, कर्मचारी संघटनेचे श्री.आंबेकर, श्री.राजू गावंडे, श्रीकृष्ण देशमुख, रामदासपेठ शाखेचे मुख्यप्रबंधक श्री. कुळकर्णी तसेच श्री.नंदकिशोर तोष्णीवाल, श्री.रामदास पाटील, श्री.मोहन आसरकर, शरद पांडे, फोकमारे, राम जोशी यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानार्जन केंद्राचे श्री.प्रकाशराव राऊत, सर्वश्री शरदराव देशमुख, सरदेशपांडे, विलास देशपांडे, यादवडकर, ए.डी.काळे, अविनाश देशपांडे व सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले व पेन्शनर संघटनेमध्ये असलेल्या एकोप्याचा परिचय दिला. सहभोजनानंतर कार्यक्रम संपला.

– **नी.स.नागराज,** सचिव (अकोला)

## वर्धा युनिट -

वर्धा जिल्हा युनिटची सर्व साधारण सभा रविवार दि. २२-३-२००९ रोजी संपन्न झाली. ह्या सभेकरता श्री. लळिंगकर, सर्कल असो.चे सचिव व श्री.नारकर, उपाध्यक्ष हे दोन पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. तसेच नागपूर झोनल सब-सेंटरचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.देसाई व सचिव श्री.वकील हेही उपस्थित होते. सुरुवातीला जिल्हा संघटक श्री.रोटकर ह्यांनी सर्व अतिथी व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मागील सभेपासून गतवर्षात ज्या सदस्यांचे निधन झाले त्यांना मूक श्रद्धांजली देण्यात आली व सर्व नवीन सदस्यांचे स्वागत करण्यात आले. श्री.रोटकर ह्यांनी गत १ वर्षाच्या युनिटच्या कार्याचा अहवाल प्रस्तुत केला. त्यानंतर श्री.लळिंगकर व श्री.नारकर ह्यांचे उद्‌बोधनात्मक भाषण झाले. उभयतांनी वर्धा युनिटच्या कार्याची प्रशंसा केली. आपल्या सर्कल असोसिएशनच्या कार्याचा आढावा घेऊन निलंबित ५ मागण्यांच्या विषयी विभिन्न हायकोर्टातील केसेसच्या प्रगतीची माहिती दिली. असोसिएशन सर्वच सदस्यांच्या समस्यांचे कसे निराकरण करते हे आवर्जून सांगितले. लंचनंतरच्या दुसऱ्या सत्रात स्थानिक सदस्यांच्या प्रलंबित प्रकरणांची चर्चा होऊन त्याचे निराकरण कसे करता येईल ह्याबद्दल योग्य मार्गदर्शन केले. श्री.झाडे ह्यांच्या आभार प्रदर्शनानंतर ही सभा समाप्त झाली.

**- अ.दा.रोटकर,** सचिव (वर्धा)

## यवतमाळ युनीट -

दरवर्षीप्रमाणे यवतमाळ युनीटचे वार्षिक स्नेहसंमेलन १५ मार्च २००९ रोजी मंजुषा मंगल कार्यालय, यवतमाळ येथे मोठ्या उत्साहात व जिल्ह्यातील बहुसंख्य सभासदांच्या उपस्थितीत संपन्न झाले. नागपूर झोनल सब-सेंटरचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई व झोनल सेक्रेटरी श्री.जयंत वकील हे या संमेलनास आवर्जून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी यवतमाळ येथील ज्येष्ठ सदस्य श्री.प्रभाकर दाणी होते. तसेच या कार्यक्रमास यवतमाळ मुख्य शाखेचे मुख्य प्रबंधक श्री.मिलिंद आपटे व दत्तचौक शाखेचे प्रबंधक श्री.विजय पांढरकर विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन झाल्यावर युनीटचे अध्यक्ष श्री.किरण पांडे यांचे प्रास्ताविक भाषण झाले. त्यानंतर सचीव श्री.मोहन मोहदरकर यांनी अहवाल वाचन केले. श्री.देसाई व श्री.वकील यांनी आपल्या भाषणात सभासदांना फेडरेशन स्तरावरील असोसिएशनच्या कार्याची माहिती दिली. तसेच विविध समस्यांसंबंधी मार्गदर्शन केले व शंकांचे निरसन केले. त्यानंतर श्री.मिलिंद आपटे, अरूण बरबडे, सुमंत तळणीकर, सौ.मांडवगणे, सौ.चिंचोलकर यांचे सुश्राव्य गायन झाले. तसेच श्री.अनिल चारभाई यांनी आपल्या विदेश यात्रेतील मजेदार किस्से सांगितले. श्री.श्रीपाद देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केल्यावर स्नेह-भोजन होऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

**- मोहन मोहदरकर,** सचिव (यवतमाळ)

## सोलापूर युनिट -

चैत्र शुद्ध प्रतिपदा-गुढीपाडवा-नववर्षदिन. भारतीय संस्कृतीत अत्यंत शुभ असलेल्या या मंगल दिनाचे औचित्य साधून स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनचे सभासद व 'जवळीक' या संस्थेचे सर्वेसर्वा शशीकांत लावणीस यांच्या वतीने हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्पी थिएटर मध्ये आलेल्या प्रेक्षकांचे स्वागत ओंजळभर मोगऱ्याच्या कळ्या देऊन दोन तरुणी सुहास्य वदनाने करीत होत्या. मोगऱ्यांच्या कळ्यांच्या सुगंधी दरवळीने चैत्र शुद्ध पाडव्याची ती सायंकाळ अधिकच धुंद झाली.

ह्यूज व गेल प्राथर ह्या दाम्पत्याचे सबंध जगभर गाजलेले "Notes to each other" हे एक नितांत सुंदर पुस्तक. अनिल कुसुरकर यांनी या पुस्तकाचा मराठीत केलेला भावानुवाद म्हणजे 'डायरीची पाने' या 'डायरीच्या पानां'चे अभिवाचन केले. शशीकांत लावणीस यांनी या अभिवचनाला सुरेल पार्श्वसंगीताने अधिक श्रवणीय व परिणामकारक केले. तासभर चाललेल्या या अभिवचनाने प्राथर पती-पत्नीच्या वैवाहिक जीवनाचा खडतर प्रवास सुसह्य व यशस्वी कसा झाला याची अत्यंत हळुवारपणे उकल करण्यात आली.

विवाहानंतर पती-पत्नीमध्ये कितीही ताणतणाव व मतभेद निर्माण झाले तरी दुराव्याची दरी न होऊ देता संयम ठेवून वैवाहिक वस्त्राची वीण उसवू न देता ती अधिक घट्ट होण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करून संसार सुखाचा करणेच चांगले.

दोन जीवांच्या मधुर मीलनी । द्वेष, कटुता कायम आणि  
टाळायचे दोघे म्हणुनि । एकच करु निर्धार !  
सुखाचा करु दोघे संसार !

हा संदेश व गुढीपाडव्याचा गोड सुगंध देऊन ती सायंकाळ चिरस्मरणीय झाली. सदर कार्यक्रमाला सोलापूर शहरातील सर्व स्तरातील जाणकार तसेच आपले बरेच पेन्शनर्स आवर्जून उपस्थित होते.

**- तम्मा पाटील,** सचिव (सोलापूर)

## Congratulations !

Mrs.Anjali Chansarkar (Kulkarni), daughter of Mr. Mangalmurti & Mrs Sumedha Chansarkar - our members from Pune - has passed 'M.Phil' in Computer Science and secured First Class from 'Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik' in December 2008. We congratulate Mrs. Anjali Chansarkar (Kulkarni), on behalf of our Association, for her great achievement in her career and wish her a bright future !

**- Secretary**

# Court Cases

## Delhi High Court Case

We have been advised by Delhi Circle Association representatives who are following up the Delhi High Court case that the hearing of the Writ Petition No.1931 of 2002 has been started. The Advocates of the Government and the Bank have asked for some time to place before the court certain documents in the matter. The Hon. Judge has granted further time for their submission and the next date of hearing has been fixed on 22nd April 2009. As this April issue of SAMVAD has gone for printing on 18th April, the latest developments in the matter can be read in due course on our web-site : **www.sbipensionerspune.org** which is being updated by us regularly whenever there is any change in the position of the court case.

**Other cases :** Our Nagpur High Court case in respect of Family Pension has been admitted by the court and its hearing has not yet been started. It is expected that the case will be listed for hearing after summer vacations. As regards other cases filed by other Circle Associations, it is learnt that these cases have not yet come up for hearing.

**Madras High Court Case :**

While disposing the petitions filed by counsel Shri. N. Seshadri, a pensioner from Chennai, regarding 7th Bipartite retirees, the Madras High Court directed the Central Government to consider the State Bank of India's proposal which was made in April 2006 to approve the draft amendment for re-fixing pension of its employees who were retired between 1-11-1997 and 1-11-2002 (popularly known as '7th Bipartite retirees') within three months from the date of direction i.e.18-10-2008. It is now learnt from our Federation General Secretary that Government may prefer an appeal against the above judgment. It is also advised by him that the petitioners of the Writ petitions have filed a review petition in the Madras High Court praying for payment of pension on revised salary from the date of retirement at 50% of the pay paid by the Bank. The review petition has also requested the Court to call for subsequent proposals submitted by the Bank to the Government. It is now learnt that Govt. has not yet appealed against the decision. Here, we want to clarify that this is an individual case and neither filed nor supported by our Chennai Circle Pensioners' Association which please be noted.

**Gratuity :** As regards upward revision in 'Gratuity', the Bank has not yet issued any circular to that effect. If issued in due course, we will let the members know through SAMVAD.

**- Secretary**

## अभिनंदन

आपले अमळनेर येथील एक सभासद श्री.रमाकांत चंद्रात्रे यांच्या सुविद्य पत्नी सौ.शैलजा र. चंद्रात्रे यांना या वर्षीचा 'सावित्रीबाई फुले - महिला गौरव राज्यस्तरीय पुरस्कार - २००९' जागतिक महिला दिनी व सावित्रीबाई फुले स्मृतीदिना-निमित्त जळगाव येथे १० मार्च ०९ रोजी प्रदान करण्यात आला. सौ.शैलजा चंद्रात्रे ह्या अमळनेर येथील भगिनी मंडळ पूर्व प्राथमिक शाळेत मुख्याध्यापिका म्हणून गेली १७ वर्षे कार्यरत आहेत. यापूर्वी देखील त्यांना 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान साहित्यभूषण पुरस्कार १९९६, नाशिक' व 'भारतीय मानवसेवा केंद्र, औरंगाबाद - राज्यस्तरीय बालभूषण पुरस्कार १९९८' या पुरस्कारांनी गौरविले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आपल्या असोसिएशनतर्फे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन !

**- सेक्रेटरी**

## चहाचे साहित्य

'मुली चहा करण्यासाठी काय काय लागते ?' वरपित्याने विचारले.

'पाणी, चहा, साखर, दूध, आले, पातेले, गॅस, चिमटा, झाकणी, गाळणी, कपबश्या, कात्री आणि सुरी' मुलीने सांगितले.

'कात्री आणि सुरी कशासाठी ?' वरपित्याने विचारले.

'दुधाची पिशवी कापायला कात्री आणि आल्याचे तुकडे करायला सुरी' मुलगी शांतपणे म्हणाली.

**- पी.के.देवधर, पुणे**

## आदरांजली

आपल्या कोल्हापूर युनिटचे 'आधारवड' व सर्वांचे आवडते श्री.बाळासाहेब दैनी यांचे दि.२४ मार्च २००९ रोजी हृदयविकाराने निधन झाले. गेल्या सहा महिन्यातील हा दुसरा धक्का. श्री.सुरेश पत्की यांचे मृत्युच्या धक्क्यातून सावरण्यापूर्वीच आपल्याला श्री.बाळासाहेबांच्या मृत्युला सामोरे जावे लागत आहे हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

मी सांगलीला १९६९ साली आपल्या बँकेत रूजू झालो त्यावेळी श्री.दैनी त्या शाखेत अधिकारी होते. मी रूजू झाल्यावर १०-१२ दिवसांतच सांगलीच्या भावे नाट्य मंदिरात श्री. दैनी यांनी दिग्दर्शित केलेला बँकेतील हौशी कलाकारांचा एक नाट्यप्रयोग झाला. त्यात सर्वश्री बाळासाहेब दैनी, श्रीकांत इनामदार, विश्वास लागू या सर्वांनी अगदी कसदार अभिनय केला होता. अर्थात ह्या मागची प्रेरणा श्री. दैनी यांचीच होती. तेव्हापासूनच त्यांचा माझ्यावर प्रभाव पडला होता.

त्यानंतर जवळजवळ ३१-३२ वर्षांनी आपल्या पेन्शनर्स असोसिएशनच्या माध्यमातून आम्ही कोल्हापूरात एकत्र आलो. यावेळी निवृत्तांच्या संघटनेचे पदाधिकारी म्हणून बाळासाहेबांची एक वेगळी ओळख झाली. पदाधिकारी होण्यासाठी जे गुण आवश्यक असतात ते सर्व त्यांच्याजवळ पुरेपूर होते. बरेच वेळा व्यक्तिजवळ कर्तृत्व व नेतृत्व असते पण या दोन्ही गोष्टींना झळाळी देणारे वक्तृत्व नसते. पण बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वात या तीनही गोष्टींचा सुरेख मिलाफ होता. ते भाषण करतांना अत्यंत मुद्देसूद बोलत. त्यामुळे त्यांचे भाषण ऐकत रहावेसे वाटे.

कांही वेळेला कांहींच्याबाबतीत नेतृत्वाच्या अहंकारापोटी बऱ्याच जणांचे शत्रुत्व निर्माण होते. पण बाळासाहेब याला पूर्णपणे अपवाद होते. ते खऱ्या अर्थाने 'अजातशत्रू' होते. पूर्वी एक सरकारी जाहिरात सर्वत्र दिसे - 'देवीचा रोगी कळवा, हजार रुपये मिळवा'. त्याच चालीवर 'बाळासाहेबांचा शत्रू कळवा, हजार रुपये मिळवा' असे म्हणावे लागेल. असे हे सर्वमान्य व्यक्तिमत्व होते. दु:ख याच गोष्टीचे होते की हे गौरवोद्गार त्यांच्या हयातीत ते एखाद्या पदावरून निवृत्त होतांना निरोप समारंभात काढायला मिळाले असते तर फार आनंद झाला असता. त्यांच्या स्मृती कायम आम्हा सर्वाच्या स्मरणात राहतील व संघटनेच्या कामात मार्गदर्शक ठरतील. त्यांची आपल्या बैठकांतील अनुपस्थिती आम्हाला कायम जाणवत राहील. त्यांच्या आत्म्याला सद्‌गती लाभो व त्यांच्या कुटुंबीयांना हा धक्का सहन करण्याचे बळ मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**- गजानन जोशी, कोल्हापूर**

भ्रमणध्वनी - ९८८१२५९८९५

## प्रतिक्रिया

मार्च २००९ चा अंक नेहमीप्रमाणे अथपासून इतीपर्यंत वाचला. दर महिन्याला वेळेत नव्हे, वेळेच्या आधीच अंक मिळतो. या सातत्याबद्दल आणि शिस्तीबद्दल संपादक मंडळाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. संपादकीय उत्तम, वाचनीयच नव्हे तर आचरणात आणावे असे. त्यात म्हटले आहे, आयुष्यात आनंदाचे क्षण कमी प्रमाणात असतात. पण मला वाटते, की तुम्हाला दु:खाचा भागाकार आणि आनंदाचा गुणाकार करायचे तंत्र जमले की नुसता गुणाकार न करता मन आपोआपच आनंदाचा वर्ग, घन वगैरे करून टाकते. मग कुठे आहे दु:ख ?

श्री.गोखले यांचा लेख वाचला, आवडला. ते म्हणतात, ' चूक कोणाची ?' मला वाटते कोणाचीच नाही. त्या परिस्थितीत त्यावेळी त्यांच्या मनाने जो कौल दिला, त्याप्रमाणे त्यांनी मदत केली. हेतु निखालस चांगलाच होता. आज चांगल्या हेतूने घेतलेला निर्णय भविष्यात चूक ठरेल की बरोबर हे आज कोण सांगणार? आपण सर्वजणच शिक्षणासाठी मदत करायला मागेपुढे पहात नाही. पण व्यवहारात अर्धवट शिक्षणाचा उपयोग न होता काही वेळा अडचणच होते. ऐलतीराचे बोट सुटलेले आणि पैलतीर गाठता येत नाही. परिस्थितीमुळे श्री गोखलेंचे बोट सुटले आणि प्रेमाने लक्ष ठेवणारे, मदत करणारे दुसरे गोखले सिद्धूला भेटले नाहीत. भेटले असते तर कोणी सांगावे तो चांगला शिकला असता आणि मग गोखलेंना आता जे चुकले की काय असे वाटते ते बरोबरही ठरले असते. समुद्रात शतधारांनी पाऊस कोसळतो, पण मोती मात्र एखाद्या शिंपल्यातच होतो. मग बाकी पाऊस वाया गेला का ? आपण जमेल तिथे मदत करावी आणि एखाद्या थेंबाचा मोती झाला तर तो बोनस समजावा.

**- सौ.उत्तरा सोमण, पुणे**

दूरध्वनी : ०२०-२४२२१८२३

******

In December 2008 issue of 'SAMVAD', Mumbai ZSC had advised that M/s R.G.Stone Urology & Laproscopy Hospital, Khar, Mumbai were organising a free medical check-up camp for SBI Pensioners. During the period mentioned threin, I visited Mumbai and took advantage of the medical camp and availed the tests. I was fully satisfied with the way in which the tests were conducted. Please convey my sincere thanks to the Hospital on behalf of all the pensioners who availed the free facility. I also thank the Association for undertaking such a facility for the sake of pensioners.

**- M.D.Dalal, Nashik**

## List of Donors who gave Donations during the period from September 2008 to March 2009

(Kindly refer earlier list published in SAMVAD for October)

| NAME | AMOUNT |
|---|---|
| MR.M.P.KHAMBETE | 12,500 |
| A WELL WISHER | 10,000 |
| MR.MADHAV PRABHU | 8,685 |
| SMT.MANGALA K.PATANKAR | 7,500 |
| MR.R.R.TAVARGERI | 7,500 |
| MR.H.M.MISTRY | 5,101 |
| RAMLINGAM D.SWAMI | 5,001 |
| MR.HOMI SHAHANA | 5,001 |
| MR.B.S.GULWADI | 5,001 |
| SMT.SARITA R.AWAD | 5,000 |
| MR.MADHAV Y.MHATRE | 5,000 |
| MR.V.M.PRABHUDESAI | 5,000 |
| SMT.MALINI SAVE | 5,000 |
| SMT.ASHA NAPHADE | 5,000 |
| MR.P.N.MADAN | 3,250 |
| LESLIE D'SOUZA | 3,000 |
| MR.S.P.KARKHANIS | 2,501 |
| MR.SHRIDHAR C.LELE | 2,500 |
| MR.T.JAWARMAL | 2,500 |
| MR.N.S.PADAMJEE | 2,001 |
| MR.JAYESH VYAS | 2,000 |
| MR.A.P.SHIRSAT | 2,000 |
| MR.G.G.SHANBHAG | 2,000 |
| SMT.KAVITA TRILOKEKAR | 2,000 |
| MR.B.G.DANDEKAR | 1,751 |
| MR.P.M.GARKHEDKAR | 1,650 |
| MR.GOVIND BAGUL | 1,500 |
| A WELL WISHER | 1,500 |
| MR.ASHOK DESAI | 1,500 |
| MR.D.A.DANVE | 1,100 |
| MR.S.B.CHAUBAL | 1,100 |
| MR.P.S.KAPOOR | 1,100 |
| MR.VISHWANATH JOSHI | 1,100 |
| MR.V.S.DANDEKAR | 1,010 |
| MR.MUKUND D.GOKHALE | 1,001 |
| MRS.UJJWAL KAISHAP | 1,001 |
| MR.D.K.VISHWAY | 1,001 |
| MR.S.A.VECHALEKAR | 1,001 |
| MR.VAMAN B.KAMAT | 1,001 |
| MR.S.M.TARE | 1,001 |
| SMT.MEENA IYER | 1,001 |
| SMT.BHAVANI S.MANIAN | 1,001 |
| SMT.NEELIMA ASHTAPUTRE | 1,001 |
| MR.VASANT RENAKE | 1,001 |
| MR.V.M.PANDIT | 1,001 |
| MR.R.K.PARAB | 1,001 |
| SMT.SHUBHADA PAWAR | 1,001 |
| MR.R.J.NAIK | 1,001 |
| MR.D.R.WALAWALKAR | 1,001 |
| MR.C.G.DANEE | 1,001 |
| MR.P.D.PANDE | 1,001 |
| MR.RAMDAS M.MAHALE | 1,000 |
| MR.K.D.PANTHAKI | 1,000 |
| MRS.CHITRA ARURKAR | 1,000 |
| MR.SAMANT | 1,000 |
| SMT.SUDERSHAN R.CHECKER | 1,000 |
| MR.S.S.CHAUBAL | 1,000 |
| MR.V.K.HERLEKAR | 1,000 |
| MR.SAVAK KARKARIA | 1,000 |
| MRS.& MR.P.K.PADGAONKAR | 1,000 |
| MR.A.L.PEREIRA | 1,000 |
| SMT.SUMITRA CHANDWADKAR | 1,000 |
| MR.T.N.TAMPAL | 1,000 |
| MR.P.R.DEGAONKAR | 800 |
| MR.S.B.DESHMUKH | 751 |
| MR.S.V.KELKAR | 750 |
| MR.P.K.DEODHAR | 750 |
| MR.S.M.BARDAPURKAR | 750 |
| MR.G.V.CHINE | 750 |
| MR.SHRINIVAS KELKAR | 701 |
| MR.A.G.PHADKE | 511 |
| MRS.MADHURI G.BANDEKAR | 501 |
| MR.V.R.VELHANKAR | 501 |
| MR.N.D.NARSINHAN | 501 |
| MR.V.R.PARAB | 501 |
| SMT.URMILA DHAIRYAVAN | 501 |
| MR.B.J.IYER | 501 |
| MR.S.M.DHARADHAR | 501 |
| MR.S.V.DESAI | 501 |
| SMT.MEERA A.ASWANI | 500 |
| MR.J.V.KHARADKAR | 500 |
| SMT.INDUKALA K.POTDAR | 500 |
| MR.SADASHIV ATHALYE | 500 |
| MR.R.R.SAHASRABUDHE | 500 |
| MR.C.P.BIWAL | 500 |
| MR.& MRS.DASS | 500 |
| MISS NEELA VYAVAHARKAR | 500 |
| SMT.MAYA PHATAK | 500 |
| SMT.M.S.LONDHE | 500 |
| MR.MINOO SIPOY | 500 |
| SMT.PRERANA SHAH | 500 |
| MR.MADHUKAR PRABHU | 500 |
| MR.P.M.CHAVAN | 500 |
| SMT.MADHURI RANADE | 500 |
| MR.JEROM FERNANDES | 500 |
| MR.DELPHINE FERNANDES | 500 |
| MR.S.T.AWDE | 500 |
| SMT.DOLLY SASSANI | 450 |
| SMT.SARALA MALODE | 400 |
| MRS.RAMA A.KAKAIYA | 351 |
| MR.C.M.KULKARNI | 325 |
| A WELL WISHER | 300 |
| SMT.SHAKUNTALA MORE | 300 |
| MR.S.S.RABBANI | 251 |
| MR.S.D.TIKALKAR | 251 |

| | |
|---|---|
| MR.D.L.SONTAKKE | 250 |
| MR.P.B.KAMAT-KHADPE | 250 |
| SMT.KRISHNABAI D.KULKARNI | 250 |
| MR.D.A.KULKARNI | 201 |
| SMT.PRADNYA RANDIVE | 201 |
| SMT.JYOTI S.TALPADE | 201 |
| MR.A.V.VARADE | 200 |
| MR.M.G.MUNOT | 200 |
| MR.VENKATESH N.PATIL | 200 |
| SMT.SHALINI A.KANADE | 200 |
| MR.V.M.MATHURE | 200 |
| MR.GAJANAN CHIPLUNKAR | 151 |
| MR.BHUPENDRA RUPAREL | 111 |
| A WELL WISHER | 101 |
| MR.A.V.NAGRAJ | 100 |
| MR.A.D.DESHMUKH | 100 |
| MR.A.J.MORE | 100 |
| MR.P.R.BHALERAO | 100 |
| MR.V.G.CHANDURKAR | 100 |
| MR.V.B.TOLAMBE | 100 |
| MR.D.S.HATEKAR | 100 |
| MR.S.M.PURWAR | 100 |
| MR.N.P.SIDDHAPURA | 100 |
| MR.S.G.GURJAR | 100 |
| MR.C.B.MOHATA | 100 |
| MR.M.R.JUMALE | 100 |
| MR.P.M.BAHEKAR | 100 |
| MR.K.V.GONDHALEKAR | 100 |
| MR.P.D.DESHPANDE | 100 |
| MR.D.R.GAIKWAD | 100 |
| MR.M.G.KHANZODE | 100 |
| SMT.PUSHPA JOSHI | 100 |
| SMT.USHA GANGAWANE | 100 |
| MR.P.G.CHAVAN | 100 |
| MR.V.D.MATHAPATI | 100 |
| MRS.HARSHADA H.KOLHATKAR | 100 |
| MR.A.M.GOKHALE | 100 |
| MR.RAMESH S.WANI | 100 |
| MR.JWALAPRASAD TIWARI | 100 |
| MR.ANIL PITAMBARE | 100 |
| MR.PRALHAD CHAVAN | 100 |
| MR.JAYANT HATHI | 100 |
| MR.NANDKUMAR KULKARNI | 100 |
| MR.K.S.GINDE | 100 |
| MR.K.S.PAWASHE | 100 |
| MR.C.V.NADKARNI | 100 |
| MR.V.V.CHHATRE | 100 |
| MR.V.J.GAWADE | 100 |
| MR.D.J.GAWADE | 100 |
| MRS.VANITA D.GAWADE | 100 |
| MR.R.M.NARINGREKAR | 100 |
| MR.ATAMARAM PATIL | 100 |
| MR.ANANDRAO SALUNKE | 100 |
| MRS.MARIA PERIERA | 100 |

## अनुकरणीय ! अभिनंदनीय !!

आपले नागपूर झोनल सब्-सेंटरचे सचिव श्री.जयंत वकील कळवितात की नागपूर येथील एक सभासद कै.व्ही.एन. ऊर्फ राजाभाऊ कोठीवान यांनी मरणोत्तर (मृत्यु दि.२४-०८-२००८) नेत्रदान व देहदान करून फार मोठी समाजसेवा केली आहे. मृत्यूपूर्वीच त्यांनी तशी इच्छा लिहून ठेवली होती व त्याची पूर्तता करण्यासाठी त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनीही योग्यवेळी त्याबरहुकूम कार्यवाही करून त्यांच्या इच्छेची अंमलबजावणी केली. खरोखर, कै.कोठीवान यांनी त्यांच्या हयातीत योग्य निर्णय घेऊन समाजाप्रती आपले अमूल्य योगदान तर केलेच. पण त्यांचे नातेवाईकसुद्धा त्यांच्या इच्छापूर्तीबद्दल कौतुकास पात्र आहेत. कै.कोठीवान यांच्या मनमिळावू स्वभावामुळे व सतत दुसऱ्यांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे त्यांच्या मित्रपरिवारात ते लोकप्रिय होते. त्यांचे हे अतुलनीय कार्य सर्वांनी अनुकरण करावे असेच आहे. असोसिएशनला कै.कोठीवान यांचा अभिमान वाटतो !

**- सेक्रेटरी**



## स्वत:च्या शोधात

स्वत:ला आपण चांगले ओळखतो अशा भ्रमांत असणाऱ्यांना वस्तुस्थितीची कल्पना नसावी असे मानणे चुकीचे ठरेल. प्रत्येक व्यक्ती परिपूर्ण नसली तरी सोईनुसार स्वनिर्मित, प्रसारित व कटाक्षाने बाळगलेले अज्ञान, स्वभाववैशिष्टे व अहंकार जपण्यात अमूल्य आयुष्य घालवले जाते. आपले व्यक्तिमत्त्व एकूण ४ भागात विभागलेले असते त्यातील १/४ भागच स्वत:ला चांगला माहित असतो. यात आपल्या क्षमतेचा, गुणावगुणांचा व बलस्थानांचा समावेश असतो. दुसऱ्या १/४ भागाची फक्त लोकांनाच माहिती असते. यात आपले स्वभावाचे निरीक्षण, समज-गैरसमज, व्यक्तिमत्त्वातील खऱ्या -खोट्यांचा आलेख व समाजातील प्रतिमा, उघड-छुपे वर्तनाचा समावेश असतो. तिसऱ्या १/४ भागात आपल्या स्वभावातील/व्यक्तिमत्त्वातील सुप्तगुणांची अर्धवट किंवा पूर्णपणे अविकसित माहिती असते. शेवटच्या १/४ भागाची स्वत:ला व लोकांनाही माहिती नसते. लोकांना व स्वत:ला अभिनज्ञ असलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या भागात अचानक प्रगट होणाऱ्या धैर्य व शौर्याचा, अफलातून निर्णयाचा व पराक्रमाचा, अलौकिक प्रतिभेचा वा विक्रमांचा समावेश असतो.

पहिल्या व दुसऱ्या भागांची माहिती एकत्रित केली तर व्यक्तिमत्वाचा ५० टक्के भाग उघड होतो. यातील ज्ञात-अज्ञात गोष्टींचे विश्लेषण करून आत्मपरीक्षणाने सुधारणेस वाव असणाऱ्या भागाची ओळख होते. ज्ञात व सुप्त क्षमतेचा व बलस्थानाचा तिसरा १/४ भाग खुलेपणा, जिव्हाळा व प्रामाणिकपणे विकसित करून आपल्याविषयीचा आदर व विश्वास द्विगुणित करता येतो. विविध छंदांतून व व्यवसायांतून मिळवलेले प्रावीण्य, संगीत, कला, क्रीडा, नाट्य,सिनेमा, राजकारण, समाजकारण व स्वनिर्मित प्रतिमाही आपली ओळख देते. अशाप्रकारे तिसऱ्या १/४ भागाचा विकास करून ७०/७५ टक्के व्यक्तिमत्त्व विकास घडवता येतो. चांगल्या सवयी, नवे काही शिकण्याचा ध्यास व उत्सुकता, सद्वर्तनाची प्रचीती देतात. नैसर्गिक वर्तनाने आपली शक्तीस्थाने व सद्गुणांची प्रचीती येऊन व्यक्तिमत्त्व अधिक तेजस्वी बनवता येते. स्वभावपरिवर्तन घडवण्यास दोषांची व सद्गुणांची जाण ठेवून कटाक्षाने प्रयत्न केल्यास व्यक्तिमत्त्वाची उंची वाढते.

सुप्त गुण/अवगुणाच्या पोटी चांगले तसे वाईटही गुण असतात. असूया, पोटात एक व ओठावर दुसरे अशी स्वभाववैशिष्टे व कोणतेही कौशल्य, कर्तृत्व, लायकी नसताना उच्च महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तींना तोंडपुजेपणाशिवाय पर्याय नसतो. निर्णयक्षमतेच्या अभावामुळे आपले पितळ उघडे पडू नये याची पुरेपूर काळजी घेताना स्वार्थाचे निर्णय मात्र चटकन घेतले जातात. स्वभावातील विरोधाभासांमुळे चांगल्या कामाचे श्रेय घेण्यात व चुकीच्या निर्णयाचे इतरांवर खापर फोडण्याच्या ढोंगीपणातून चांगुलपणाचा आव आणला जातो. दडवलेली खरी प्रतिमा कठीण प्रसंगी उघड होऊन पराभूत व अपमानित जीणे जगावे लागते तेव्हा कोणीही त्यांची साथ देत नाही.

अविकसित व्यक्तिमत्त्वाच्या भागात चांगुलपणा जोपासण्याचा मार्ग काटेरी असला तरी तो अत्यंत आवश्यक असतो. हा दोष घालवणे जेवढे अवघड तेवढेच सदाचारी वर्तन ठेवणे कठीण असते. दोष उघडे पडले की त्याचा सार्वत्रिक धिक्कार होतो. सदाचारी व्यक्तीची चूक लोकांचा अपेक्षाभंग करते, कारण त्यांच्या पारदर्शक वर्तनाच्या विसंगत वर्तन स्वीकारले जात नाही. स्वार्थी व्यक्ती संघर्ष टाळतात कारण त्यांना वाईटपणा नको असतो. स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण व मूल्यमापन करून एखाद्याशी संबंध ठेवायचे, की अघोषित बहिष्कार टाकायचा ह्याचा निर्णय लोक घेत असतात. अशा संकेतातून सुधारणेची दुष्कृत्ये करणारी माणसे हेतुपूर्वक मृदू संभाषणाचा मार्ग अवलंबतात. आपण जे कधी अनुभवले नाही वा हातभार लावला नाही अशा कार्याचे उघडपणे श्रेय घेण्याच्या त्यांच्या स्वभावाने त्यांचे अवमूल्यन होते. हा मानसिक अपंगत्वाचा भाग असल्याने संपूर्णपणे नष्ट करता येत नसला तरी दुर्दम्य इच्छाशक्तीने मनाचा वेध घेत सुधारणा घडवून आणता येते.

माहीत नसलेले ज्ञान अवगत असल्याचे ढोंग उघडे पडून अब्रूचे धिंडवडे निघाल्याची अनेक उदाहरणे आपण पाहतो. त्यामुळे अज्ञानाची गुप्तता खलबते करण्यासाठीच वापरली जाते, सार्वजनिक वर्तणुकीत नाही. गुप्तपणे केलेली दुष्कृत्ये अल्पजिवी ठरतात. युद्धात गुप्ततेचे बल शत्रूवर मात करण्यास मदत करते. घोटाळ्यांची व छुप्या दुर्गुणांची परिणती व्यक्तिमत्त्व अध:पतनात व मरणप्राय बदनामीत होते. भ्रष्टतेचे धैर्य जीवनातील संकटाचा सामना करण्यास वापरले तर जीवनस्फूर्ती वाढते. सरळ जीवनपद्धती व आचरण जीवन अधिक गुंतागुंतीचे न करता संकटाशी सामना करण्यास आत्मविश्वास व आत्मबल वाढवते. गीतेत म्हटल्याप्रमाणे सत्कृत्याचे फळ सात्त्विक, निर्मळ असून दुष्कृत्ये नेहमी अंधार व दु:ख पसरवतात. स्वत:चा शोध घेऊन आपली खरी ओळख पटवता येते.

– **पुरुषोत्तम तडवळकर,**पुणे
भ्रमणध्वनी – ९४२२३०९०११

## स्वागत

घट्ट लावून घेतलेली दारं
बाहेर 'स्वागत असो' चं तोरण
अहो, हे कसलं घर बंद करून
स्वागत करण्याचं धोरण ?

– **शरद महाबळ**, पुणे

# सणसमारंभातील आधुनिक दृष्टिकोण

आषाढ महिना लागला की आमचा चातुर्मास सुरू होतो आणि इथूनच असंख्य सणवारांची सुरूवात होते. त्यातल्या त्यात श्रावण मासात तर भरपूर सण. श्रावण महिना हा श्रवण भक्तीचा महिना मानला जातो, व याच महिन्यात चांगलं वाचन, लिखाण, पोथीपुराण पुण्याचं मानलं जातं. आमच्या पूर्वजांनी व ऋषीमुनींनी हे सणवार साजरे करण्याची शिकवण देताना यात अध्यात्मिक शिकवण देण्यापेक्षा वैचारिक आणि बौद्धिक पातळीवर विचारांचं आदान प्रदान करण्याचं उद्दिष्ट ठेवलं असावं. किंबहुना हाच त्याचा मुख्य उद्देश आहे. आषाढी एकादशी. पंढरीला जाणाऱ्या वाऱ्या आपल्याला खूप काही शिकवून जातात. एकमेकांना साथ देत, एकमेकांची दु:ख जाणून घेत, विठुरायाचा नामघोष करीत गटागटाने अनेक समुह पंढरीत दाखल होतात. या एका वारीच्या पुण्याईचं भांडवल त्यांना वर्षभर पुरतं.

भारतीय संस्कृतीमध्ये व्रत, उत्सव, सण, समारंभ, यात्रा यांना एक वेगळे महत्त्व आहे. सर्वाधिक सण व उत्सव कुठे साजरे होत असतील तर ते हिंदु धर्मातच होय. कारण आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी सणाच्या माध्यमातून मानवी जीवन सरस व सुंदर बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. प्रत्येक सण, समारंभ वा उत्सवामागे सुप्त वा गुप्त सांस्कृतिक हेतु दडलेला असतो. एखादा विशिष्ट विचार वा हेतु समोर ठेऊनच त्याची आखणी केलेली दिसून येते.

या सण उत्सवाचे स्थूल मानाने २ विभाग पडतात. एक ऋतुचक्रातील बदल व मानवी जीवनावरील त्याचा परिणाम आणि त्यातूनच मूळ मानवी मूल्यांचे रक्षण हा होय. उदा. होळी, दिवाळी, वसंत पंचमी, श्रावणी, संक्रांत इ. सणांचा दुसरा वर्ग म्हणजे महापुरुषांची पुण्यस्मृती होय. ज्यातून त्यांचे गुण, कर्तृत्व, चारित्र्य, महानता यांचे दर्शन व रक्षण होय. जसे रामनवमी, जन्माष्टमी, हनुमान जयंती इ. दोनही उत्सवांचा उद्देश हाच की मानवी जीवन नित्याच्या संसारात नीरस, चिंताग्रस्त वा भाररूप न वाटता, ईश्वरी सान्निध्यात सांसारिक आधी व्याधींनी कंटाळलेले लोक नव्या उत्साहाने व जागृतीने पुनरूज्जीवित व्हावेत. जीवनातील आनंद, उत्साह व औत्सुक्य यांचं मिलन म्हणजे सण. आमची होळी म्हणजे जसा वाईट गोष्टींचा त्याग व चांगल्या गोष्टींचा प्रारंभ होय. तसेच शेतातील नवीन पिकांचे स्वागतही. उच्च-नीच, गरीब-श्रीमंत भेद विसरून, गुलाल-चंदन-अबीर याची उधळण होय. ऋतुराज वसंतगमन म्हणजेच वसंत पंचमी, दीपावली, लक्ष्मीपूजन, गणेश चतुर्थी. संकटनाशक, बुद्धिदात्या गणेशाचा उत्सव म्हणजे राजनीती, पौराणिकता व सामाजिक संघटन यांचा सुरेख संगम होय.

लोकमान्य टिळकांनी याच उत्सवातून महाराष्ट्रात लोकजागृती व ब्रिटिशांविरूद्धचे संघटन केले. व्यक्तिगत व सामाजिक दोन्ही स्तरावर सण साजरे करण्याने मानवी जीवन संस्कारित व संघटित होते. या सण उत्सवामागील प्राचीन ऋषींची दूरदर्शिता पाहिली म्हणे सणामागील खालील उद्देश डोळ्यासमोर येतात.

लोकजागृती, संघटना, सद्‌भावना, लोकांना सुसंस्कृत, शिस्त प्रिय व सुयोग्य नागरिक बनविणे, सामाजिक समरसतेची भावना उत्पन्न करणे. दुसरे ऋतुपरिवर्तनातील बदल लोकाभिमुख करून प्राकृतिक संबंध वाढविणे. तेव्हा सण उत्सव समाजाला नवजीवन प्रदान करणारे व स्फूर्तीदायी होत.

पण खेदाची गोष्ट म्हणजे हिंदु धर्म तत्त्वज्ञान यात जशा विकृती निर्माण झाल्या तशाच विकृती या सणसमारंभाच्या स्वरूपातही वाढत गेल्या. मूळ उद्देश व वास्तविक स्वरूप यांत अंतर पडत गेले. स्वार्थी, अशिक्षित लोकातील अंधश्रद्धेने या सण उत्सवात प्रवेश केला. त्यातूनच नागपंचमीला नागाचा छळ होऊ लागला. श्रावणात येणारा पोळ्याचा सण म्हणजे या प्राणीमात्रावर कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण. त्याला एकाच दिवशी सजवून गोड धोड खायला घालण्यापेक्षा वर्षभर त्यावर प्रेमाचा वर्षाव कां होऊ नये ? त्याऐवजी त्याला दारू पाजून शर्यत आणि धिंगाणा. दीपावलीतील अतिरेकी खानपान, शानशौक यातून नवीन उपद्रव निर्माण झाले. गणेशोत्सवात भाविकांबरोबर गुंडागर्दी करणारे मवाली आत शिरले. वर्गणी, दमदाटी, हिडीस दर्शन यातून संस्कृतीलाच काळे फासले गेले.

भारतातील निम्म्यापेक्षा जास्त जनता दारिद्र्यरेषेखाली आहे. यांना कुठले आले सणवार ! आमचे हे सण साजरे करताना प्रत्येक सणाला एखाद्या तरी गरिबाला किंवा गरजूला आपल्यात सामावून घेतलं तर जीवनाचं सार्थक होणार नाही का ? दु:खी माणसाला जर आपल्या आनंदात सहभागी करून घेता आलं तर त्याचा आनंद नक्कीच द्विगुणित होईल. अशी सामाजिक बांधिलकीची जाणीव प्रत्येकाने ठेवली तर ! आपल्याकडे कितीतरी अन्न वाया जाते, ते वाचवून भुकेल्याच्या तोंडी लागलं तर तो नक्कीच दुवा देईल. दिवाळीला आपल्याच घरात अनेक पणत्या लावण्यापेक्षा, एखादी तरी पणती अंधारलेल्या घरात लावली तर ? असे सशक्त विचार मनात आले तरचखऱ्या अर्थाने सण साजरे होतील.

आता वेळ बदलली आहे. विज्ञानाची घोडदौड, नीतिमत्ता व स्वातंत्र्याची जाणीव विश्वव्यापी होत आहे. तेव्हा सणसमारंभातील त्रुटी दूर करणं आवश्यक आहे.

मानवी जीवनातील आस्था, श्रद्धा, विश्वास, भावना व निष्ठेला योग्य दिशा व वळण देण्याची गरज भासत आहे. ध्येयाचा वारा आपल्या जीवनात भरपूर शिरू द्या म्हणजे आपले जीवन सतेज होईल. ध्येयार्थी लोक ज्या देशात अधिक निपजतात, तो देश

वैभवशाली होतो, त्यालाच गौरवाचे व आदराचे स्थान प्राप्त होते. त्यासाठीच तर सारे सण समारंभ आहेत. यातून जीवनाचे नम्र उपासक बना. सभोवतालचा सारा संसार सुखी नि समृद्ध करा. ज्ञान व विज्ञानात संपन्न व कलामय व्हा. हीच एक तळमळ आहे. सृष्टीचे मित्र बना. तिच्या कुशीत शिरा, निसर्गावर प्रेम करा. निसर्ग आपली माता आहे. तिच्यावर मात करू नका.

भूतकाळातील काही गोष्टी आता चुकीच्या वाटल्या तर त्या दूर न करणे म्हणजे भूतकाळाचा अपमान होय. तो भूतकाळाचा गौरव नाही. तो पूर्वजांचा गौरव नाही. उलट त्या थोर ऋषीमुनींचा अपमान होय. निस्तेज जीवन जगू नका. मुखावर तेज, दृष्टीवर तेज, वाणीत तेज, विचारात बुद्धीचे तेज, सारे जीवन सणासमारंभासाठी तेजोमय करा.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, वर उल्लेखिलेल्या आधुनिक दृष्टिकोनाची री पुढे ओढताना मी असं म्हणेन की स्वत:पुरता स्वार्थी विचार न करता दुसऱ्याचा विचार करा. गरजवंताला आपल्या आनंदात सहभागी करता आलं तर करून घ्या. सत्पात्री दान करा आणि सुविचारांची देवाण घेवाण करा. असं केलं तरच सण समारंभ खऱ्या अर्थाने साजरे केल्याचं समाधान तर मिळेलच पण जीवन सार्थकी लागल्याचा परमानंद होईल.

मराठवाडा ही संतांची भूमी आहे. कुठल्याही संतचरित्राचा अभ्यास केला तर आपल्या हेच लक्षात येईल की या संतांनीसुद्धा या आधुनिक दृष्टिकोणाचीच शिकवण सातत्याने दिली. त्यामुळे प्रत्येक सण साजरा करताना या संतांची जरी आठवण मनापासून केली आणि त्यांचा उपदेश अंमलात आणला तर पुण्याचं काम होईल. या संतमहात्म्यांना विनम्र अभिवादन करून या ललीत लेखास पूर्णविराम देतो.

– **शरद महाबळ**, पुणे
भ्रमणध्वनी – ९३७२४२८३२२.

## नाम महात्म्य

दोन दिवस तासन्तास कष्ट करूनही तिळावर काटा चढला नाही म्हणून हलवा करायला बसलेली भगिनी निराश होऊन ते काम सोडून देत नाही.

त्याचप्रमाणे साधकानेही आजकालच्या नाम चिंतनात ब्रह्मानंद मिळाला नाही म्हणून नामाचा अभ्यास सोडू नये, कारण तिळावर काटा चढणार हे जितके निश्चित तितकेच नामात आत्मसुख मिळणार हे सत्य आहे !

– अक्कलकोट स्वामी महाराज
(संग्राहक – सौ.सुनिता बेलसरे)

## जय लोकशाही !

भारत माझा देश आहे माझा देश महान आहे.
त्यातले सारे राजकारणी माझे बांधव आहेत.
साऱ्या राजकीय पक्षांवर माझी निष्ठा आहे.
राजकारणातील सर्व भ्रष्टाचार मला मान्य आहे.
मी सोयीस्कर पणे पक्ष बदलू शकतो.
माझ्यावर कोणत्याच पक्षाचे बंधन नाही,
वेळ आल्यास मी नवा पक्ष काढू शकतो,
आणि वेळ आल्यास माझा पक्ष दुसऱ्या पक्षात विलीन करू शकतो.
राजकारण आमचा धंदा आहे .
गुंतवणुकीच्या दहापट उत्पन्न आम्ही काढू शकतो.
आमच्या संपत्तीचा थांग अजूनही कुणाला लागत नाही.
प्रत्येक निवडणूक आम्हाला एक पर्वणीच असते.
सत्तासंपादन, ह्या एकाच ध्येयाने आम्ही प्रेरित असतो.
त्यासाठी आम्ही कुठलाही विधिनिषेध बाळगीत नाही.
आमच्याच वारसांना आम्ही सत्ता सोपवितो.
आमचीच घराणेशाही चालावी हीच आमची इच्छा असते.
हे आम्हाला भारतातील लोकशाहीतच शक्य आहे.
ह्यालाच आम्ही लोकशाही मानतो.
जय लोकशाही ! जय भारत ! जयहिंद ! वंदे मातरम् !
जय जवान ! जय किसान !
भारत माझा देश आहे. माझा देश महान आहे.

– **वसंत धुपकर,** पुणे

## भानगडीचो मंत्री

स्वर्गीय श्री.यशवंतराव चव्हाण १९७६ साली केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री असताना एकदा रूमानियाच्या दौऱ्यावर गेले होते. तेथून परत आल्यावर दिल्लीत त्यांच्या एका मंत्री मित्राने त्यांना हसत हसत विचारले, 'काय हो, यशवंतरावजी, तुम्ही रूमानियात कसल्या बाहेरच्या भानगडी करून राहिलेत ?' श्री. यशवंतरावांना याचा काही अर्थबोध झाला नाही. त्यांनी विचारले, ''मी आणि बाहेरच्या भानगडी आणि या वयाला ?'

तेव्हा त्या मित्राने त्यांना गोव्यातल्या एका कोकणी पत्राने त्यांच्या रूमानियाच्या दौऱ्याविषयी बातमी दिलेले कात्रण त्यांना दाखविले. त्या बातमीचे शीर्षक असे होते. भारताचो भायल्या भानगडीचो मंत्री (External Affairs Minister) रूमनियाक.'

हे वाचून श्री यशवंतराव पोट धरून हसले.

– **गजानन जोशी,** कोल्हापूर

# मराठी कां बोलायचं ?

मराठीतच कां बोलायचं ? असं म्हटल्यावर आठवते ती नाना फडणवीसांची गोष्ट. पेशव्यांच्या दरबारी आलेला एक बहुभाषापंडित इतक्या भाषा सफाईदारपणे बोलायचा की त्याची मातृभाषा कोणती तेच कळत नव्हते. शेवटी तो झोपलेला असताना नानांनी त्याच्या तोंडावर पाणी मारल्याबरोबर तो ज्या भाषेत ओरडला तीच त्याची मातृभाषा हे चाणाक्ष नानांनी क्षणात ताडलं.

म्हणूनच 'मराठीत कां बोलायचं ?' असं विचारणं म्हणजे आपल्याला जन्म देते तिला 'आई'च कां म्हणायचं असं विचारण्यासारखं नाही का ? ज्याप्रमाणे बोलायला लागल्यावर बालमुखातून 'आई' हा शब्द बाहेर पडतो, त्याप्रमाणे त्याच्या लिहिण्याची सुरूवात 'श्रीगणेशा'ने होते. त्यामुळे आपली मातृभाषा म्हणजे आई व ईश्वराला जोडणारा दुवा आहे, असं म्हटलं तर वावगं ठरू नये.

आपलं पूर्व जन्मीचं सुकृत म्हणून ज्ञानेश्वर तुकारामांसारखे संत, टिळक-आगरकरांसारखे थोर पत्रकार, अत्रे-खांडेकर पुलंसारखे लेखक, तांबे-कुसुमाग्रजांसारखे कवी अशा अगणित साहित्यिकांमुळे समृद्ध झालेली मराठी आपल्याला मातृभाषा म्हणून लाभली आहे. म्हणूनच तर 'मराठी असे आमुची मायबोली' असं आपण सार्थ अभिमानाने म्हणू शकतो. पण महाराष्ट्र राज्य होऊन ६० वर्षे झाली तरी राज्यभाषा असलेल्या मराठीची अवस्था सुकुमाग्रजांच्या शब्दात 'डोक्यावर राजमुकुट व अंगावर फाटकी वस्त्रे' अशी दयनीय आहे. अर्थातच मराठीच्या या पीछेहाटीला 'घर को आग लगी घरके चिरागसे' या न्यायाने आपणच जबाबदार आहोत. शतकानुशतके महाराष्ट्रशारदेचा जरिपटका अभिमानाने खांद्यावर मिरवणारे साहित्य दिंडीतील वारकरी आता मराठीचे 'वार'करी व्हावे यापेक्षा दुर्दैव ते कुठले ?

एखाद्या बाबुमोशायला बंगालीत, पुत्तरला पंजाबीत, अण्णा, अप्पा वा अम्माला कानडी तेलगु किंवा तामीळमध्ये अथवा भैयाला हिन्दी बोलायला 'सरम' वाटत नाही, पण आपल्याला मात्र मराठी लिहायलाच नाही तर बोलायला सुद्धा लाज वाटते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दोन मराठी माणसे भेटल्यावर एकतर 'क्या, कैसा, क्या है ?' अशा धेडगुजरी हिंदीत किंवा 'व्हॉट, व्हॉट, व्हाय, व्हाय' सारख्या भाषांतरित इंग्लिशमध्ये बोलतात. आता तर हिंदी इंग्लिशचे भ्रष्ट रिमिक्स 'हिंग्लिश'चा जमाना आहे. आपल्याच मातृभाषेबद्दल एवढे उदासीन राहिलो तर मराठी अस्तित्व जपायचे कोणी ? कानडीच्या सक्तीच्या बाबतीत अवाक्षर निघत नाही. पण मराठी भाषा शिका म्हटलं की इतर भाषिकांच्याबरोबर मराठी भाषिकांचाही सूर नाराजीचा असतो. पेटून उठण्याचा वगैरे प्रश्नच नाही.

मराठी लिहिणं, वाचणं किंवा बोलणं म्हणजे इंग्लिशला किंवा इतर भाषांना गौण लेखणं असा कुठे आहे ? इतर भारतीयच नव्हे तर परदेशी भाषा शिकून बहुभाषिक होणं यासारखी दुसरी कौतुकास्पद गोष्ट नाही. पण आज 'इथे मराठीचिये नगरी' मराठी भाषेची अशी दुरवस्था होण्याची कारणे काय ?

शासनाची मराठीच नव्हे तर इंग्लिश भाषेच्या बाबतीत धरसोड वृत्ती, मराठी वृत्तपत्रांमधील बातम्यांची शीर्षके, मजकूर, लेख, अग्रलेखातूनही इंग्लिश शब्दांचा सर्रास वापर, फक्त नावामध्ये 'मराठी' शब्द असलेल्या वाहिन्यांवरील बातम्या, मालिका, तथाकथित मराठी कार्यक्रमातून चुकीच्या मराठीचा वापर, इंग्रजीचे प्राबल्य व हिंदी शब्दांचा भडिमार आणि मुख्य म्हणजे या सगळ्यांना पाठिंबा देणारे घराघरातले 'श्यामची मम्मी' व 'सॅमचे डॅडी' या सगळ्याच्या एकत्रित व विपरीत परिणामामुळे मराठीची अवस्था 'न घरका न घाटका' अशी विचित्र झालेली आहे. विशेषत: आजची चाळीशीतली पिढी व त्यांच्या मुलांना तर 'पुलं' च्या भाषेत 'मराठी वर्ड्स् रिमेंबर करायला डिफिकल्ट जाते' मग बोलताना बिचाऱ्याची काय अवस्था होते ते आपण प्रत्यक्ष अनुभवतोच आहोत.

याला बरोबर छेद देणारे तुर्कस्थानसारख्या छोट्या देशातील दोन किस्से. केमाल पाशाची मुलगी सत्तेवर असताना आपले एक राष्ट्रपती तिकडे भेटीला गेले होते. तिथे विमानतळावरील स्वागताचे भाषण तुर्कीत केले. पण घरी दिलेल्या खान्याच्या वेळी त्यांच्याशी ती अस्खलित इंग्लीशमध्ये बोलली होती. कारण विचारताच ती म्हणाली, 'विमानतळावर मी माझ्या राष्ट्राची प्रतिनिधी होते. पण घरी ते माझे खासगी पाहुणे होते.'

तुर्कस्थानचा कारभार तुर्कीत कधी व कसा चालू करता येईल यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्षांना तिने एकदा विचारले, 'तुर्कीत कामकाज सुरू व्हायला किती वेळ लागेल?' 'अजून निदान सहा महिने' 'असं ? मग ते सहा महिने आज रात्री बारा वाजता संपले म्हणून समजा. उद्यापासून देशाचा कारभार तुर्कीत सुरू झालाच पाहिजे ?' तिने करारीपणे फर्मावले.

फ्रान्सचे अध्यक्ष शिरॉकही आपल्या एका मंत्र्याने इंग्लिशमधून भाषण केले म्हणून एका आंतरराष्ट्रीय परिषदेतून उठून गेले होते. आपल्याकडे मराठीच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? इतर राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री पत्रकार परिषदेत व प्रसार माध्यमांसमोर बिनदिक्कतपणे आपापल्या भाषेत बोलत असतात. याउलट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असोत किंवा वर्षानुवर्षे दिल्लीत राहिलेले केंद्र मंत्री असोत ना धड इंग्लिशमध्ये ना धड हिंदीत बोलू शकतात. मराठीच्या बाबतीत जास्त न बोललेले बरे!

आपल्याकडील इंग्लिश भाषेच्या पगड्याला ती जागतिक ज्ञानभाषा असल्याचे कारण पुढे केले जाते. याही बाबतीत प्रत्यक्ष अनुभवावर आधारित परिस्थिती काय आहे ?

खुद्द इंग्लंडमध्ये स्कॉट व आयरीष भाषेचा सवता सुभा आहे. अमेरिकेसारख्या खंडप्राय देशात इतर अनेक स्थानिक भाषा बोलल्या जात असल्या तरी स्वत:ची अशी 'अमेरिकन इंग्लिश'

प्रयत्नपूर्वक, पूर्णपणे व स्वतंत्रपणे विकसित केली आहे. कॅनडामध्येही अनेक भाषांना जोडणारी भाषा फ्रेंच आहे. जिला ltnouafranca म्हणतात. रशिया, चीन व जर्मनीमध्ये इंग्लीशला मज्जाव नाही तर सबंध युरोपमध्ये त्या त्या देशाच्या भाषेत जागतिक टक्केवारी किती ?

आमचा अनुभवच सांगायचा झाला तर अलिकडेच युरोपला गेलो असताना इंग्लंड सोडल्यास इतर दहा-एक देशात बहुतेक ठिकाणी मोठ्या शहरांपासून ते छोट्या गावांपर्यंत इंग्लिश समजत असूनही आमची अवस्था मुंबईत आलेल्या अशिक्षित खेडुतासारखी झाली. फार कशाला ? पॅरिसमधील एका हॉटेलात तर एका निग्रोने आम्हाला 'नो इंग्लिश' अशा दोनच शब्दामध्ये ठणकावले. तेव्हा आमचा चेहरा पाहण्यासारखा झाला असावा !

आज अनेक वर्षे परदेशात स्थायिक झालेले महाराष्ट्रातील लोक आपली भाषा जपतात. बोलतच नाहीतर तर लिखाण करतात. मासिक चालवतात. कार्यक्रम बसवतात. उदा. डॉ.मीना प्रभू, डॉ.नेरूरकर, डॉ.लाभसेटवार, डॉ.प्रभुंची नातवंडेही शुद्ध व स्वच्छ मराठी बोलतात. यावर कदाचित विश्वास बसणार नाही. इस्त्रायलमधले ज्यू तर आम्ही व्यवहारापुरती हिब्रू वापरतो. बाकी 'सबकुछ मराठी' असं मोठ्या अभिमानाने सांगतात. कॅनडात चाळीस वर्षे राहिलेले एक महाराष्ट्रीय भाषणात म्हणाले, 'मी मराठी किती अस्खलितपणे बोलू शकतो हे तुम्हाला माझ्या अस्खलित शब्दांच्या उच्चारावरून कळेल. ग.दि.माडगूळकरांच्या वेबसाईटला भेट देणारे 'लाखात एक' अमेरिकेतील गृहस्थ उद्गारले, 'इंग्लिश वातावरणात वाढून आम्ही काय कमावलं यापेक्षा मराठी वातावरणात न वाढून आम्ही काय गमावलं ते आज समजलं.'

सातासमुद्रापलिकडे मराठी मातृभाषा इतकी जपता येते, तर मग मराठी मातीतच मराठी 'मोगरा' न फुलता इंग्लिश 'डॅफोडिल्स' का फोफावतात ? हे म्हणजे इंग्लिश 'मेरी' ला दुधाचा अभिषेक व (देव) घरातील महाराष्ट्र शारदा पारोशी' असं झालं.

मराठी भाषेच्या भक्कम पायावर इतर भाषांचे मजले खुशाल उभारावेत, अन्यथा पत्त्याचे घर कोसळल्याशिवाय राहणार नाही. अगदी इंग्लिश भाषेचं तथाकथित जागतिक महत्त्व गृहीत धरलं व मराठी 'आई' व इंग्लिश 'मावशी' मानली तरी मावशी जगावी म्हणून माय मारणे हा कृतघ्नपणाच आहे !

मराठी टिकवायची असेल तर इंग्लिश बोलणाऱ्या मुलांच्या कानाखाली आवाज काढा ! अशी साहित्य संमेलनातली अतिरेकी भाषा व ठराव नकोत. कमीत कमी 'घरात' मराठी व इंग्लिश 'घराबाहेर' इतका निश्चय केला तरी मराठी नंदादीपाची ज्योत आपल्या मुलांनातवंडांपर्यंत तेवत राहील. अन्यथा मराठी बोलीभाषा म्हणूनही उरणार नाही.

**- मुकुंद गोविंद सराफ**, विलेपार्ले (पू.) मुंबई
दूरध्वनी - २६१५०२४८

## विडंबन काव्य - कोटि कोटि रुपये...

(मूळ काव्य : कोटि कोटि रूपे तुझी....)

कोटि कोटि रुपये मिळती
एक एक कामातून
दिशा अशी कुठली आहे
जिथे नाही माझी जमीन ।।ध्रु. ।।
करून काम, गाळून घाम घेतले शिक्षण
नोकरी मिळाली म्हणुनी केली वणवण
परी बदल घडुनी आता सुधारले जीवन ।।१।।
गुरू मजसि ऐसा भेटे करू काय वर्णन
सर्व कृष्णकृत्यामध्ये असे तो निपुण
मिळू लागले मजलाही हळूहळू काळे धन ।।२।।
आरंभास थोडे माझे कचरले हे मन
परि आता माया केली सर्व मार्ग अनुसरून
मानती आता मज सारे एक श्रेष्ठ धनवान ।।३।।

**- पी.के.देवधर, पुणे**
भ्रमणध्वनी - ९८९०१३००६८

## नका विचारू आंबा कसा

*(चाल- नका विचारू देव कसा ?)*

नका विचारू आंबा कसा ?
आंबा असे हो महाग तसा
मँगो म्हणूनी म्हणती त्याला
आम्र असेही वदती त्याला
विश्वप्रिय त्या मधुर फळांचा
व्यापार विदेशी असे खासा
रंग आंब्यांचा भुलवी नयना
कीर्ती आंब्याची पसरे गगना
दिसेल कधी तो कुणास सांगा
आंबा स्वस्त मोहकसा
आंबे असती विविध स्वादांचे
असती ते अनेक जातींचे
रायवळ, हापूस, बलसाड, पायरी
विकत घ्या हो, ज्याला जसा

**- अरूण भट, बदलापूर (पूर्व)**
भ्रमणध्वनी - ९३२४५५८०५१

## 'ट्रॅफिक जॅम....'

परवा गल्लीत भांडण झालं. ब्राह्मण, क्षत्रिय, मराठा, लिंगायत अशी अठरा पगडबंद कुटुंब असलेल्या आमच्या गल्लीत एक गवळ्याचेही घर आहे. २५-३० जनावरे मावतील अशा 'गोठ्या-' सह. पण गवळ्याचे हे 'गाई-म्हशींचे' कुटुंब दिवसा अन् रात्री गल्लीतल्या चिंचोळ्या रस्त्यावरच नांदतं. सोबतीला एक (लाकडाची) बैलगाडीसुद्धा रस्ता अडवून उभी असते. इतर आडमुठ्या जनावरांसारखी. भरीस गवळ्यानं घरासमोरच्या छोट्या बोळात जमीन खोदून एक 'चर' केला आहे. त्यात तो शेण साठवतो. दररोज प्रामाणिकपणे २५-३० गुराढोरांचं हे शेण ह्या 'चरात' साठवलं जातं. साहजिकच त्यामुळे अनारोग्य. गाई-म्हशींच्या मलमूत्राची दुर्गंधी अगदी गल्लीभर. गाई-म्हशी दिवसा आणि विशेषत: रात्री रस्त्यावरच (फतकल मारून) बसलेल्या. दोन्ही बाजूंनी येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकीवाहनांना, मोटारींना 'कायम बंद' चा सिग्नल मिळाला की त्यांचे कर्णकर्कश्श हॉर्न सुरू होतात. 'गवळीआप्पा' या अशा किरकोळ तक्रारींची कधीच दखल घेत नाही. हॉर्नचा गोंगाट फार वाढला तर तो स्वत: (कमीच) किंवा त्याचा कुटुंबकबिला एखादी काठी घेऊन जमीन धोपटत गुरांना बाजूला करत येतो. रस्ता मोकळा झाला की पाचच मिनिटांनी पुन्हा जैसे थे अन् पुन्हा 'ट्रॅफिक जॅम' ! जनावरांसाठी कडब्याची गाडी आली (तीहि दुपारच्या झोपेच्या वेळी) की एक एक रे, दोन दोन रे करत कडब्याच्या पेंड्या मोजायला सुरूवात होते. मोजताना (पाढा चुकला की पुन्हा पहिल्यापासून पुढे ! ) अशी शाळा सुरू असते.

ही तर रोजची कटकट असह्य झाल्याने परवा गवळ्याच्या घराला लागून असलेल्या घरातल्या कर्त्या पुरुषाने धीर करून तोंड उघडलं आणि मग जे भांडण सुरू झालं ! सगळी गल्ली बाया बापड्यांसहित गोळा झाली. सगळे आपापल्या घरांच्या दारातूनच हे पहात होते. गवळ्याचं समस्त कुटुंब अगदी लेकी, बाळी, सुनांसह विरूद्ध दिशेला युद्धाच्या पावित्र्यात उभं राहिलं अन् शिव्यांचा वर्षाव सुरू ! १५ मिनिटांच्या अथक् 'लढती'नंतर मध्यमवर्गीय पांढरपेशीय कर्ता पुरुष डगमगला. तो काय बिचारा शिवीगाळ करणार ? नाही त्याची सुशिक्षित पत्नी त्याच्या सहाय्याला आली ऽ ऽ पण मग गवळ्याच्या कुटुंबानं तिचा गळाच धरला. शेवटी ते पांढरपेशीय कुटुंब शक्तिपात झाल्याप्रमाणे माघार घेऊन आपल्या बिळात (घरात) शिरलं. बघणारेही हळूहळू पांगले.

वास्तविक हा गवळ्याचा त्रास (बाहेरच्या) दुचाकी, चारचाकी वाहनांना बाहेर काढणाऱ्या इतरांनाच होत होता असं नाही. तर गल्लीत कायम राहणाऱ्यांनाही होत होता. तेव्हा सगळ्यांच्याच मनात गवळ्याविषयी असंतोष होताच. परंतु ज्यानं धीर एकवटून विरोध केला त्या सामान्य पतीपत्नींच्या साहाय्याला कोणीही धावून आलं नाही. गवळ्याच्या तोंडून न ऐकवणाऱ्या शिव्यांचा भडिमार अथवा गवळ्याच्या कुटुंबानं त्या गरत्या बाईचा गळा धरल्यावरसुद्धा कोणी पुढे आलं नाही. भांडण सोडवणं, गवळ्याच्या शिवराळ तोंडात भडकावणं वगैरे लांबच. कारण सगळेच 'मला काय करायचंय' किंवा 'कायऽकी' वालेच !

आपल्याच आसपास अशा कितीतरी अन्याय्य गोष्टी होत असतात. विनामूल्य (सांस्कृतिक) कार्यक्रमात अकारण अनेक खुर्च्या अडविलेल्या असतात. बस स्टॉपवर, रेल्वे स्टेशनवर, सिनेमागृहात, दूधविक्री केंद्रावर, सरकारी कचेऱ्यांतून रांगा लावलेल्या असूनही घुसाघुसी होते. धक्काबुक्कीत वृद्ध माणसांना ढकलले जाते. माणसं सारखी पुढे पुढे सरकत असतात. खरंतर व्यवस्थित रांगेत उभे राहून जे काम वेळेवर होऊ शकते. ते अशा भाऊ गर्दीने आणि घुसखोरीने विनाकारण लांबते. बऱ्याचवेळा हातघाईवर यावे अशी गर्दीही नसते. पण उशीरा आलो तरी आपले काम आधी व्हावे, आपला नंबर आधी लागावा, आपली गाडी पुढे आधी काढावी असे प्रत्येकालाच वाटत असते आणि मग 'ट्रॅफिक जॅम' होतो. कधी माणसांमुळे, कधी म्हशींमुळे ! पण हा विचार कोण करणार ? हे चार विचार आपण विचार करावा म्हणून !

**- शशीकांत लावणीस,** सोलापूर

भ्रमणध्वनी - ९४२१०२६२७९

## श्री महालक्ष्मीचा किरणोत्सव : सूर्याला निमंत्रण

*(कोल्हापूरच्या श्रीमहालक्ष्मी दैवताचा किरणोत्सव वर्षातून २ वेळा होतो. त्यावेळी पहिल्या दिवशी मावळतीच्या सूर्याचे किरण श्रीमहालक्ष्मीच्या चरणावर, दुसऱ्या दिवशी कटीवर, तिसऱ्या दिवशी देवीच्या मुखकमलावर मंदिरात पोहोचतात असा हा किरणोत्सव. आई अंबाबाईचा गोंधळ.......)*

भास्करा, गोंधळाला ये, आईच्या गोंधळाला ये ॥
तुझा तीन दिसांचा खेळ, रवी किरणांचा निव्वळ
गोंधळ वाजवी संबळ, आई तुझाच हा गोंधळ.
दिनकरा, गोंधळाला ये, आईच्या गोंधळाला ये ॥
येशी अंबेला भेटण्या, धावशी चरण गाठण्या
सहा मासीच्या पाहुण्या,
दक्षिणायणी, उत्तरायणी ये रे बा लौकर
भास्करा, गोंधळाला ये, आईच्या गोंधळाला ये ॥
आज विसावं चरणावर, उद्या पोहचशील कटीवर,
परवा स्थिर हो मुखकमलावर, किरणांचे जोडुनी कर,
सूर्यदेवा, गोंधळाला ये, आईच्या गोंधळाला ये ॥
वाटेत अडथळे फार, आई लवकर कर ग दूर
भक्ता दर्शन दे सत्वर, तुझ्या भेटीस आतुर फार
दिनमणी, गोंधळाला ये, आईच्या गोंधळाला ये ॥
तीन दिसांचा तू पाहुणा, मंदिरी येशी पुन्हा पुन्हा,
तुजसवे अधिर दर्शना, विनविती भक्ति भावना,
प्रभाकरा, गोंधळाला ये, अंबेच्या गोंधळाला ये ॥
उद उद उद उद उद उद उद उद उद उद उद हां:ऽ

**- प्रभाकर कानिटकर,** कोल्हापूर,

भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## समज येणार कधी ?

आमच्या काळी, तुमच्या वेळी
झडतात ना फैरी, सदासर्वकाळी !
घरातच काय, पण दारातही
स्थळाचंच काय, पण वेळी-अवेळी !
निमित्त असतं, तसं नसतंही.
वेळ असला काय, नसला तरीही.
दोन-चार वाढता वाढता,
जमतात मंडळी कधीही कुठेही !
पोटतिडिकीचा तिचा स्वर
अनुभव ओकतो भराभर
होतो संताप अनावर
शब्द अपुरे - उरते फक्त थरथर !
नवा जोश, नवा उत्साह.
नाउमेद न व्हायचा निग्रह.
मागचाच कित्ता गिरविण्यात अर्थ काय ?
धाडस विचारण्याचं, आपटून हात-पाय !
घडते ना असेच, अधून मधून
शब्द वेगळे पण अर्थ तोच, फिरफिरून
उकल शोधण्याचा, केलाय का प्रयत्न ?
सांगाल काय मग -
चूक कोण नि कोण सूज्ञ ?
प्रवाह जसा, परिस्थिती जशी.
तुलना नकोच, सापेक्षता अशी !
नीर-क्षीर न्याय हाताशी
नको हार, नको कुणाची सरशी !

**- संतोष गोरे,** अहमदनगर
भ्रमणध्वनी - ९८२२०७९९६०

## राष्ट्रभक्ती

सत्तांधांची पाशवी शक्ति जिथे करितसे राज
त्या भूमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।ध्रु. ।।
रामराज्य ते जिथे नांदले, पुरुषार्थाचे वैभव ठरले
निर्दाळुन अति दुष्ट शक्तींना, भारतभूवर अमर जाहले
त्याच राघवा कल्पित ठरवी, जिथे द्रविडांची फौज
त्या भूमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।१ ।।
भोगुनि काळे पाणी ज्यांनी, उलथविली परसत्ता
गर्जुन जयजयकार शिवांचा, कापला शत्रुचा पत्ता !
परि उद्‌घोष क्रांतिचा दडपून जेथे, भ्याड शांतिचे पखवाज
त्या भमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।२ ।।
भाई-भाईचा मंत्र मुखी, अन् कपट नीतीची चाल
अमन-शांतीच्या अतिरेकाने, गाफील जवाहरलाल !
लक्ष योजने गेली भूमि, परि नाही खंत ना लाज
त्या भूमीवर जन्म घेतला लाज वाटते आज ! ।।३ ।।
लाहोर जिंकिले रक्त सांडुनि, हा विजयाचा इतिहास
अखंड भारत येइल उदया, हा मनोमनीचा ध्यास !
परि ताष्कंदातील एका सहीने, जिथे ठेचली आस
त्या भूमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।४ ।।
संसद म्हणजे या देशातील, लोकशाहीची शान
घाला पडता यवनांचा, किती शहीद झाले जवान !
परंतु अजुनि जिथे चालतो, अफजलगुरूचा माज
त्या भूमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।५ ।।
मातृभूमि मज अतीव प्यारी, प्राण अर्पिण्या असे तयारी
स्व-राज्याचे सुराज्य करण्या, आग उरामधे धगधगणारी !
परी त्यावरी पोळी भाजुन जिथे, शमवतील आपुली खाज
त्या भूमीवर जन्म घेतला, लाज वाटते आज ! ।।६ ।।

**- गोविंद करमरकर,** सांगली
०२३३-२३२०९११

## आजतक

दिल्ली कोर्टात सुनावणीस (निकाल आपल्यानंतर)



पेन्शन वाढ आणि थकबाकी मिळण्याचा दाट योग आहे पण लाभ फक्त पुनर्जन्मानंतरच.

**- मधुकर पालकर,** पुणे

## 'लाईट एन्टरटेन्मेंट !'

अहो काय चाललंय हे ? त्या टेबललॅंपची सारखी उघडझाप उघडझाप करत बसलात ते. लहान मुलांसारखेच चाळे चालले आहेत. तो बल्ब उडेल ना !

'अगं याला Light Entertainment म्हणतात. तू सारखी म्हणतेस ना, सारखं पुस्तकात डोकं घालून बसता. थोडी हलकी फुलकी करमणूक तरी करावी माणसानं !'

**- मधु रानडे,** नाशिक

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## मराठी साहित्यविश्वातील दोन अविस्मरणीय घटना

मराठी साहित्य विश्वात नुकत्याच घडलेल्या दोन महत्त्वपूर्ण घटनांकडे आम्ही साहित्यरसिकांचं लक्ष वेधू इच्छितो. हिंदुस्थानच्या सीमा ओलांडून अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील सॅन होजे येथे दि. १४ व १५ फेब्रुवारीला पार पडलेले पहिले 'विश्व मराठी साहित्य संमेलन' ही त्यापैकी पहिली महत्त्वाची घटना. अनेक वाद-विवादांच्या आवर्तनांतून यशस्वीपणे बाहेर पडून अखेर 'अखिल भारतीय' असं न संबोधता 'विश्व मराठी साहित्य संमेलन' हे नाव धारण करीत संपन्न झालेले हे पहिलेच संमेलन. डॉ.गंगाधार पानतावणे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन झाले. महाराष्ट्रातून गेलेले सुमारे २५० साहित्यरसिक प्रतिनिधी व अमेरिकेतील शेकडो मराठी साहित्यप्रेमी या संमेलनाला उपस्थित होते. अमेरिकेतील 'महाराष्ट्र मंडळ बे एरिया' या संस्थेच्या पुढाकाराने आणि स्वागताध्यक्ष संदीप देवकुळे व सहकाऱ्यांच्या अथक परिश्रमांमुळे हे संमेलन यशस्विपणे पार पडले. हे पहिलं-वहिलं 'विश्व मराठी संमेलन' म्हणून त्याचं विशेष महत्त्व आहे.

मराठी साहित्य विश्वातील दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे दि. २० ते २२ मार्चच्या दरम्यान महाबळेश्वर येथे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' यांच्या नावाने उभारलेल्या भव्य मंडपात पार पडलेले '८२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन'. हे संमेलन अभूतपूर्व परिस्थितीत आणि अनेक पूर्व परंपरांना छेद देत संपन्न झाले. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या भाषणाने उद्घाटन सोहळा गाजला. पण हे संमेलन नियोजित अध्यक्ष डॉ.आनंद यादव यांच्याशिवाय आणि अध्यक्षीय भाषणाविनाच पार पडले. डॉ.आनंद यादव लिखित 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीच्या एका प्रकरणातील संत तुकाराम यांच्या विषयीच्या आक्षेपार्ह व बदनामीकारक मजकुरामुळे वारकऱ्यांच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या. वारकऱ्यांनी आंदोलन छेडलं. डॉ.यादवांच्या राजीनाम्याची मागणी केली. डॉ.आनंद यादव यांनी ती कादंबरी मागे घेतली. तुकाराम महाराजांच्या चरणी आपलं माफीपत्र सादर केलं. परंतु तेवढ्याने वारकऱ्यांचं समाधान न झाल्यामुळे डॉ.यादव यांनी अखेर संमेलनाच्या तीनच दिवस आधी आपला अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अखेर अनेक घटनात्मक अडचणींतून मार्ग काढीत हे संमेलन अध्यक्ष व अध्यक्षीय भाषणावाचून पार पडले.

म्हणूनच अमेरिकेत संपन्न झालेले 'पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन' आणि महाबळेश्वरी संपन्न झालेले '८२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' मराठी साहित्य प्रेमी विसरणे शक्य आहे का ? मुळीच नाही.

**- संपादक मंडळ**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

*If Undelivered Please Return to :*

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.